# T15/AGR206/EE/20160302

**वेळ : 3 तास** **गुण : 80**

---

**सूचना :**

1) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
2) प्रत्येक उप-प्रश्न पाच गुणांचा आहे.
3) प्रत्येक उप-प्रश्नाचे उत्तर 75 ते 100 शब्दांत लिहा.
4) पहिल्या ओळीमध्ये प्रश्न क्रमांक आणि उपप्रश्न लिहिल्यानंतर उत्तरे लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर स्वतंत्र पृष्ठावर लिहावे.

---

1. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.
   - अ) आंब्यास कोणत्या प्रकारचे हवामान मानवते ते लिहून आंब्याची चांगली वाढ होण्यासाठी कशी जमीन हवी ते लिहा. 5
   - ब) महाराष्ट्रात लागवडीखाली असलेल्या केळींच्या सुधारीत जातींची नावे लिहून केळीची अभिवृद्धी याबद्दल टिप लिहा. 5
   - क) द्राक्षवेलींना वळण देण्यासाठी आणि आधार देण्यासाठी कोणत्या मांडव पद्धती वापरल्या जातात ते लिहा. 5
   - ड) संत्रा उत्पादनासाठी बहार कोणता व कसा धरावा ते सविस्तर लिहा. 5
   - इ) मोसंबी लागवडीसाठी पूर्वतयारी आणि कलमांची निवड कशी करावी याची माहिती लिहा. 5

2. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.
   - अ) लिंबाच्या झाडांना पाणी देतांना कोणती काळजी घ्यावी ते सविस्तर लिहा. 5
   - ब) पपनसाची अभिवृद्धी आणि लागवड पद्धती याबद्दल माहिती लिहा. 5
   - क) ग्रेपफ्रुटसाठी खते आणि पाणी यांचे नियोजन कसे करावे ते सविस्तर लिहा. 5
   - ड) डाळींबाची छाटणी आणि वळण देण्याचे तंत्र याबद्दल सविस्तर लिहा. 5
   - इ) पेरूच्या फळांची काढणी केव्हा व कशी करावी ते लिहा. 5

3. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.
   - अ) पपईची अभिवृद्धी कोणत्या पद्धतीने करतात ते लिहून रोपे तयार करण्याच्या पद्धतीविषयी सविस्तर लिहा. 5
   - ब) अंजीर पीकाच्या महाराष्ट्रात लागवडीखाली असलेल्या सुधारीत जातींची नावे लिहून अंजीराच्या परिपक्वतेची लक्षणे लिहा. 5
   - क) हवामान आणि जमीन यांचा विचार करता महाराष्ट्रात बोर लागवडीस असलेली संधी याविषयी माहिती लिहा. 5
   - ड) सिताफळांची काढणी, उत्पादन आणि विक्री याविषयी माहिती द्या. 5
   - इ) रामफळाची अभिवृद्धी याविषयी माहिती लिहून रामफळांच्या फळाचे पोषणदृष्ट्या महत्त्व लिहा. 5

4. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) कलींगडावरील महत्त्वाच्या किडी आणि त्यांचे नियंत्रण याविषयी माहिती लिहा. 5

ब) खरबुजावरील प्रमुख रोगांची नावे लिहून त्यांच्या नियंत्रणाचे उपाय लिहा. 5

क) बिबा झाडांना कोणते हवामान मानवते ते लिहून बिबा झाडाचे महत्त्व विशद करा. 5

ड) जांभळाच्या झाडाचे प्रकार लिहून त्यांची थोडक्यात गुणवैशिष्ट्ये लिहा. 5

इ) चिंचेच्या फळांची काढणी, उत्पादन व विक्री याविषयी सविस्तर माहिती लिहा. 5